नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अमरावती कृषि हवामान सल्ला दिनांक – २८ जुलै २०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २८ जुलै २०२० ते ०२ ऑगस्ट २०२०)				
दिनांक	२९/०७	३०/०७	३१/०७	०१/०८	०२/०८
पाऊस (मिमी)	५	७	७	६	४
कमाल तापमान (अं.से.)	३५	३४	३४	३४	३४
किमान तापमान (अं.से.)	२४	२४	२४	२५	२४
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८५	८३	८२	८१	८३
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६५	६०	६०	५६	५६
वा-याचा वेग (किमी / तास)	२	२	२	२	२
वा-याची दिशा	२९४	२९४	२९४	२९२	२९२
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार दिनांक २८, ३१ जुलै व १ ऑगस्ट रोजी हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे तसेच २९ व ३० जुलैला बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सर्व पिक		पावसाची उघडीप पाहून वापसा येताच आंतरमशागतीची कामे आटपावी व सर्व पिकात वातावरणाचा अंदाज घेऊन उगवण नंतर तणनाशकांची लेबल क्लेम शिफारसीनुसार फवारणी करावी. मुलस्थानी जलसंधारणासाठी पेरणीनंतर कपाशी पिकात अंदाजे ३०-३५ दिवसांनी तसेच सोयाबीन मध्ये अंदाजे ३० दिवसांनी सरी काढावी. सर्व पिकात किड व रोगाचे सर्वेषण करून पावसाची उघडीप पाहून योग ते उपाययोजना करावी.
सोयबीन	वाढीची अवस्था	मुलस्थानी जलसंधारणासाठी पेरणीनंतर सोयाबीन पिकात अंदाजे ३० दिवसांनी प्रत्यक तीन ओळीनंतर डवरणीच्या वेळी डवर्याच्या दात्याला दोरी बांधून सरी काढावी. सोयाबीन मध्ये आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी तसेच १५ ते २० दिवसांच्या सोयाबीन पिकात वातावरणाचा अंदाज घेऊन तण व्यवस्थापानासाठी उगवण पाच्शात तणनाशकांमध्ये इमेझीथायपर १०% एसएल @ १०-१५ मिली किंवा इमेझीथायपर + इमजोमॉक्स ७० % डब्ल्यूजी@ २ ग्राम किंवा प्रोपक्विझाफॉप २.५ % + इमेजिथायपर ३.७५ % @ ४० मिली प्रती १० लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी. ज्या ठिकाणी खोड माशीचा प्रादुर्भाव आढळून आला असेल त्या ठिकाणी खोड माशीच्या सर्वेक्षणासाठी एकरी ४ ते ५ पिवळी चिकट सापळे उभारावेत. खोड माशीच्या व्यवस्थापनेसाठी बळी पडलेल्या झाडाचा किडग्रस्त भाग नष्ट करावा. जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळीपेक्षा जास्त (१०% किडग्रस्त झाडे) असेल तर क्लोरनट्रानिप्रोल १८.५ % @ ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी. हिरवी उंट आळीचा जिथे प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळीपेक्षा जास्त (४/मि ओळी) असेल तर क्लोरनट्रानिप्रोल १८.५ % @ ३ मिली

		प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. चाक्रभूंगाचा जिथे प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळीपेक्षा जास्त (१०% किडग्रस्त झाडे) असेल तर क्लोरनट्रानिप्रोल १८.५ % @ ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
कपाशी	सुरुवातीची वाढीची अवस्था	मुलस्थानी जलसंधारणासाठी पेरणीनंतर कपाशी पिकात अंदाजे ३०-३५ दिवसांनी प्रत्यक दोन ओळीनंतर डवरणीच्या वेळी डवर्याच्या दात्याला दोरी बांधून सरी काढावी. पावसाची उघडीप पाहून वापसा येताच आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून कपाशीचे पिक ताणविरहित ठेवावी. कपाशी पिकाशी २० ते ३० दिवसाच्या अवस्थेत तण व्यवस्थापानासाठी वातावरणाचा अंदाज घेऊन उगवण पाच्शात तणनाशकांमध्ये पायरिथिओबक सोडियम १०% ई.सी.@ १२.५ ते १५ मिली किंवा पायरिथिओबेक सोडियम ६% ई.सी. + क्विझॉलोफॉप इथील ४% ई. सी. @ २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी. पिकात शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून हेक्टरी ४ ते ५ फेरोमेन ट्रेप लावावी. वेळेवर पेरणी केलेल्या कपाशी पिकात काही ठिकाणी फुल अवस्थेत शेंदरी बोंडअळीचा प्रधुर्भाव आढळला आहे त्याच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मि ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कीटकनाशकाची फवारणी करण्या अगोदर किडग्रस्त फुल वेचून नष्ट करावी व जिथे ५ टक्के च्या वर नुकसान झाले आहे तिथे क्वीनॉल्फॉस २५ टक्के एएफ @ २५ मिली किंवा क्लोरोप्यरीफॉस २० टक्के इसी @ २५ टक्के प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. प्राथमिक अवस्थेतील मावा व तुडतुडे च्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच ज्या ठिकाणी (१० मावा ,२-३ तुडतुडे प्रती पान) नुकसान झाला आहे अश्या ठिकाणी १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मिली किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मिली किंवा इमिडाक्लोरीड १७.८ टक्के एसएल २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
तूर	पेरणी/ उगवणी	तूर पिकात पावसाची उघडीप पाहून वापसा स्थिती येताच आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी.
मुग / उडीद	उगवणी / वाढीची अवस्था	मुग व उडीद पिक २०-२५ दिवसाचे झाले असल्यास पावसाची उघडीप पाहून वापसा येताच आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी.
मका	उगवणी / वाढीची अवस्था	मका पिकात पावसाची उघडीप पाहून व पिक २५ ते ३० दिवसाचे झाले असल्यास नत्राचा वरखत ४० किलो प्रती हेक्टर डवरणी सोबत द्यावा. मका पिकात लश्करी अळीच्या सर्वेक्षाणासाठी प्रती एकरी ५ फेरोमेन सापळे लावावे व गरज पडल्यास नियत्रणासाठी अधिक सापळे लावावे. प्राथमिक अवस्थेमध्ये नुकसान (५ टक्के च्या वर) असेल तर हाताने अळी वेचून नष्ट करावी किंवा नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
ज्वारी	उगवणी / वाढीची अवस्था	ज्वारीपिक २५ ते ३० दिवसाचे झाले असल्यास नत्राचा वरखत ४० किलो प्रती हेक्टर डवरणी सोबत द्यावा.

भाजीपाला	-	मिरची, वांगी, टोमाटेची, पत्तागोबी व फुलगोबी या पिकांची ४ ते ६ आठवडे वयांचे रोपाची शेतात लागवड करावी.
फळझाडे	-	संत्रा व मौसंबी फळबागेत झाडाच्या बुंध्याला जमिनीपासून १ मीटर वर पर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. ज्या फळबागेत पाणी साचून आहे अश्या अतिरिक्त पाणीला उताराच्या दिशेने चर खोदून बाहेर काढावे.
पशु / जनावरे		पावसाळ्यात शेळ्या-मेंढ्यांना कोवळा हिरवा चारा खाल्ल्याने पोटात जंतूंची वाढ होते व विष तयार होते व विषबाधा होते ते टाळण्यासाठी आंत्रविषार रोगाच्या लसीच्या १५ दिवसांच्या अंतराने दोन मात्रा टोचून घ्याव्यात. जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यापासून जनावरांच्या संरक्षणाची उपाययोजना करावी

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.